<u>नि.फौ.ख.क्र.५७/२०२३</u>
शासन–वि–बाबुराव चव्हाण
**नि.क्र.२७.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**
मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,
नाव – शिवाजी नामदेव चव्हाण,
वय – ६५ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार– दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. माझी जमीन दापोडी गावात गट नं. २६५ अशी आहे. पूर्वी या जमिनीच्या रस्त्यासाठी माझ्यात आणि माझा चुलत भाऊ बाबुराव हरिभाऊ चव्हाणमध्ये आमच्यामध्ये वाद होता. सदरचा वाद कोर्टात तडजोडीने मिटला आणि माझ्या जागेतून सामाईकात ६ फुट रस्ता त्यांना द्यायचे ठरले. वादातील घटना दि. ०५.०६.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता माझ्या राहत्या घरापाठीमागे घडली होती. माझ्या घराचे बांधकाम चालू असल्यामुळे मी केडगावला राहत होतो आणि दररोज सकाळी बांधकामाच्या ठिकाणी येत होतो. त्याचप्रमाणे दि. ०५.०६.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मी बांधकामाच्या ठिकाणी आलो असताना पाहिले की, आरोपी बाबुराव चव्हाण हा मी येण्याजाण्यासाठी सोडलेल्या ३ फूट जागेत बांधकात करीत होते. मी त्यांना त्या जागी बांधकाम करु नका असे सांगितल्यावर ते माझ्या अंगावर धावून आले आणि मला अश्लील भाषेत शिवीगाळ केली, दमदाटी केली आणि लाथाबुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. सदर मारहाणीमुळे मी खाली पडलो. मी खाली पडल्यानंतर आरोपीने बांधकामासाठी आणलेली वीट उचलून माझ्या डोक्यात मारली आणि मला धमकी दिली की, तुला आता जीवंत ठेवत नाही. सदरचा मार लागल्यामुळे मी जोरात ओरडलो. जखम झाल्यामुळे मी रक्तबंबाळ झालो. ओरडल्यामुळे शेजारी उभी असलेली माझी पत्नी आली आणि माझी अवस्था पाहून मोठयाने ओरडली. माझ्या पत्नीचा ओरडण्याचा आवाज ऐकून आरोपीचा मुलगा सुनिल बाबुराव चव्हाण तिथे आला आणि त्याने त्याच्या वडीलांना तेथून घेऊन गेला. त्यानंतर आम्ही केडगाव पोलीस चौकीत गेलो. तेथे पोलीसांनी उपचार करण्यासाठी दवाखान्याची चिठ्ठी दिली. त्यानंतर आम्ही यवत सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे डॉक्टरांनी टाके घातले आणि पट्टी केली. तसेच डोक्याला मार लागल्यामुळे स्कॅन आवश्यक असल्याचे सांगून त्यांच्याकडे ती सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ससून हॉस्पीटल पुणे येथे जाण्यास सांगितले. त्यानुसार आम्ही ससून हॉस्पीटल पुणे येथे जाऊन स्कॅन केले आणि रिपोर्ट घेऊन पोलीस स्टेशनला गेलो. त्यानंतर केडगाव पोलीस चौकी येथे माझी तक्रार रात्री उशीराने १.१७ वाजता नोंदवून घेण्यात आली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही

तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२८** देण्यात येते. त्यानंतर मी घरी आलो.

२. काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा बांधकामावर गेले असताना माझ्या लक्षात आले की, आरोपींनी वादातील बांधकाम करण्यासाठी मी माझ्या घराची भिंत आणि दरवाजा तोडून त्याचे नुकसान केलेले आहे. त्यामुळे मी पुन्हा पोलीस स्टेशनला सदर नुकसानीबाबत तक्रारी अर्ज दिला. आता मला दाखविण्यात आलेला अर्ज तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२९** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांना मी आवश्यक कागदपत्र दिले. आता मला दाखविण्यात आलेला माझ्या घराचा ८अ चा उतारा आहे आणि वाडग्याचा उतारा तोच आहे. सदरचे पब्लीक डॉक्युमेंटची सही शिक्याची प्रत असल्यामुळे त्यास **नि.३०** आणि **नि.३१** देण्यात येते. तसेच पाडलेल्या बांधकामाचे तीन फोटो मी पोलीसांना दिले होते. आता मला दाखविण्यात आलेले फोटो तेच आहेत. त्यांना ओळखीसाठी **आर्टीकल ए १ ते ए ३** देण्यात येते. ज्या विटेने मला मारहाण झाली त्याला पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला मुद्देमाल क्र. ११/२०२५ तोच आहे. त्याला साक्षीदाराने ओळखलेले आहे. त्यास **आर्टीकल बी** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. आरोपीची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर त्याची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. डी. खंडागळे यांच्यामार्फतः–**

३. मी पाटबंधारे खात्यातून सेवानिवृत्त झालो आहे आणि माझे शिक्षण बी.कॉम पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीदेखील महसूल खात्यात कामाला होता आणि सेवानिवृत्त झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे वय अंदाजे ८०–८५ वर्षे आहे. माझ्या घरापासून केडगाव पोलीस स्टेशन ३ किमी अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून केडगाव पोलीस चौकीला जाण्यासाठी अनेक वाहने उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे चारचाकी वाहन आहे आणि त्यावेळी मी मोबाईल वापरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून केडगाव पोलीस चौकीला मी १० मिनीटांत पोहोचलो होतो. केडगाव पोलीस चौकीत तक्रार देताना माझ्यासोबत माझी पत्नी होती. घटना घडल्यानंतर मी अर्धा तासात पोलीस स्टेशनला पोहोचलो होतो.

४. हे म्हणणे खरे आहे की, घटना ५ तारखेला घडली होती आणि फिर्याद मी ६ तारखेला दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना मी एक दिवसाच्या उशीराने दिली. साक्षीदार म्हणतो, दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर मी ५ तारखेला उशीराने ६ च्या पहाटे फिर्याद दिली होती.

५. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी वकील आहे आणि आरोपीचा मुलगासुध्दा वकील आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००० साली आरोपीने माझ्याविरुध्द दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात आणि आरोपीमध्ये अनेक वर्षांपासून रस्त्यावरुन वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्याविरुध्द प्रायव्हेट कंम्प्लेंट दाखल केलेली आहे, जी आजपर्यंत प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्याच्या आसपास प्रकाश दत्तुबा चव्हाण, मुरलीधर चव्हाण, सतीश चव्हाण, अशोक चव्हाण यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आसपास ७०–८० लोकांची लोकवस्ती आहे. सदर केसमधील साक्षीदार नामे मारुती तिकोटे हे केडगाव येथे राहणारे आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते साक्षीदार माझ्या बांधकामावर बांधकाम करण्यासाठी आलेले कामगार होते. हे म्हणणे खरे आहे की, कामगार असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. साक्षीदार नामे संगीता चव्हाण मी माझी पत्नी आणि राजाराम नामदेव चव्हाण हा माझा भाऊ आहे. तसेच हिराबाई पांडुरंग चव्हाण ही माझी भावजय आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली त्यावेळी माझ्या घराचे बांधकाम सुरु असल्याने त्या ठिकाणी वीट पडलेले होते. साक्षीदार म्हणतो, प्लास्टरचे काम चालू असल्यामुळे माझ्या बांधकामावर वीट पडलेले नव्हते.

६. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा केला होता. त्यावेळी पंच म्हणून बबन बापू रुपनवर आणि युवराज जिजाबा रुपनवर उपस्थित होते. सदरचा पंचनामाची वेळ मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. २६५ चा ७/१२ मी पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि. २८ च्या फिर्यादीत नेमकी कोणती शिवी दिली याबाबतचा तपशील नमूद नाही. साक्षीदार म्हणतो, शिवीगाळ असे नमूद केले आहे. पोलीसांनी जप्त केलेल्या विटेची लांबी रुंदी मला आठवत नाही. साक्षीदार म्हणतो, प्रमाणित वीटची साईज होती. मला मारहाण झाल्यानंतर रक्त माझ्या कपडयावर पडले होते. माझे रक्त पडलेले कपडे पोलीसांनी जप्त केले होते. साक्षीदार म्हणतो, पोलीसांनी थोडया दिवसांनी मला ते कपडे परत दिले. पोलीसांनी माझा दोन वेळा जबाब नोंदविलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा पुरवणी जबाब घटनेनंतर चार महिन्यांनी नोंदविलेला आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील मजकूर, "माझ्या घराचे बांधकाम चालू असल्यामुळे मी केडगावला राहत होतो आणि दररोज सकाळी बांधकामाच्या ठिकाणी येत होतो, ते माझ्या अंगावर धावून आले आणि मला अश्लील भाषेत शिवीगाळ केली” हे वाक्य पोलीसांना सांगितले होते. हे वाक्य पोलीसांना दिलेल्या जबाबात नमूद नसल्याचे कारण मी सांगू शकत नाही. आर्टीकल अ वरील फोटो यादव फोटोग्राफरमार्फत काढून घेतले होते. ते फोटो १०–११ तारखेला काढले होते. फोटोग्राफरकडून पावती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्या किती रुपयांचे नुकसान केले हे माझ्या जबाबात नमूद नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमूद सर्व घटना मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या भागात अनेक विटभट्ट्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे बांधकाम चालू असताना मी माझ्या चुकीमुळे पडलो आणि त्यातून मला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत असलेल्या वादाच्या वैमनस्यातून मी त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- १०.०२.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.